कविता:- चित्त माझे त्रस्त आहे.......

काय करावे काही कळेना; कुठेतरी कुरबुर आहे
सर्व गोष्टी हाती असूनी; कुठेतरी अस्वस्थ आहे

नोकरीच्या सर्व इच्छा; पुरुनी मी आश्वस्त आहे
तरी सुद्धा भविष्याचा; चिंतातूर मी जंतू आहे

सवंगडी ते जुने आता; प्रत्येकास भेटतो आहे
तरी सुद्धा एका कुणाची; साद मी मुकतोच आहे

घरामध्ये तसे पाहता; सर्व काही मस्त आहे
तरी सुद्धा कुठेतरी; एक धागा निसटला आहे

जुन्यापुराण्या आठवणींचा; डोलारा सावरलो आहे
काळाच्या ओघात मी; काही तरी गमावलो आहे

अध्यात्म यातुनी साथ देईल; असे एकदा वाटले जरी
नंतर कळले मी भलताच; नवखा त्या वाटेवरी

देव आहे मान्य आहे, कृपा होईल खात्री आहे
तरीसुद्धा चालू दु:खाच्या; मी असा अधीन आहे

संसार तसा छान चाललाय; त्यात जरा मी मस्त आहे
प्रभूच्या आशीर्वादाने; हातपाय आपला मारतो आहे

तसे एकूण पाहता मित्रांनो; माझे सारे मस्त आहे,
तरी सुद्धा का कळेना; चित्त माझे त्रस्त आहे

© सचिन पुरुषोत्तम कुलकर्णी
sachin.kulkarni78@gmail.com
www.saarthbodh.com